पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय
पौड रोड, पुणे ४११ ०३८

## । मराठी विभाग ।

| कार्यक्रम । उपक्रम | उद्दिष्टे | तपशील | सहभागी विद्यार्थी | फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| □ शारदाबाई पवार पुण्यस्मरण | □ शारदाबाई पवार यांच्या कार्याची ओळख करून करून देणे.<br>□ बहुजन समाजातील कर्तृत्ववान स्त्रियांच्या विचारकार्याची व शिक्षणक्षेत्रातील कार्याची ओळख करून देणे.<br>□ कुटुंबाच्या जडणघडणीतील आईचे महत्त्व. | □ सोमवार : दि. १३ ऑगस्ट २०१८<br>□ शारदाबाई पवार यांच्या पुण्यस्मरणाच्या निमित्त कार्यक्रमाचे आयोजन.<br>□ या प्रसंगी शारदाबाई पवार यांच्या जीवनप्रवासाच्या अनुषंगाने डॉ. विजय बालघरे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यात डॉ. बालघरे यांनी शारदाबाईंचा जीवनप्रवास उलगडला. शिवाय शारदाबाईंचे बालपण, शिक्षण, जिल्हा परिषदेतील कार्य, मुलांची जडणघडण, त्यांच्या विचारांचा वारसा आदी पैलूंवर प्रकाश टाकला. | □ सदर कार्यक्रमास शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. | □ शारदाबाई पवार यांच्या विचारकार्याचे यानिमित्ताने स्मरण.<br>□ कर्तृत्ववान बहुजन स्त्रियांच्या कार्याचा आढावा घेतला. |

| कार्यक्रम / उपक्रम | उद्दिष्टे | तपशील | सहभागी विद्यार्थी | फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| □ पत्रकारिता (अॅड ऑन कोर्स) | □ विद्यार्थ्यांना पत्रकारितेची ओळख करून देणे.<br>□ या योगे व्यावसायिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी पूर्वतयारी करून घेणे.<br>□ संपादन व लेखनकौशल्य विकसित करणे. | □ दि. ६ सप्टेंबर २०१८ पासून सुरुवात.<br>□ तज्ज्ञ व अनुभवी पत्रकार श्री. यू. व्ही. धुमाळे हे पत्रकारितेवर मार्गदर्शन करतात.<br>□ आतापर्यंत एकूण १२ व्याख्याने झाली.<br>□ येणाऱ्या सत्रात आठ व्याख्याने आणि वीस प्रात्याक्षिके घेण्यात येणार आहेत. तसेच मान्यवर वृत्तपत्राच्या कार्यालयास भेट देण्यात येणार आहे. या संस्था भेटीतून वृत्तपत्राचे कामकाज कसे चालते, तेथे कोण कोणते विभाग असतात, हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जाणून घेता येणार आहे.<br>□ समन्वयक : डॉ. विजय बालघरे | □ सदर अभ्यासक्रमास ४७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. | □ विद्यार्थ्यांना पत्रकारितेची ओळख झाली.<br>□ बातमी लेखनाची प्रक्रिया समजली.<br>□ शीर्षके/मथळे कशी द्यावीत हे समजले. |
| □ वाङ्मय मंडळ उद्घाटन | □ विद्यार्थ्यांची वाङ्मयाबद्दलची अभिरुची घडवणे<br>□ त्यांच्या कलागुणांना वाव देणे<br>□ उत्तमोत्तम कलाकृती व लेखक यांची ओळख<br>□ विविध विषयांबद्दल व्याख्याने आयोजित करणे | □ सोमवार : दि. १०-सप्टेंबर-२०१८ रोजी सकाळी ९.१५ वाजता कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन साहित्य अकादमी सन्मानप्राप्त लेखक ल. म. कडू यांच्या हस्ते झाले. त्यांनी आपला लेखकीय प्रवास उलगडून दाखवला.<br>□ ल. म. कडू म्हणाले : अनुभवाशी प्रामाणिक राहूनच कसदार लेखन करता येते. दैनंदिन जीवन जगत असताना आलेल्या बऱ्या-वाईट अनुभवावर प्रत्येकाने लेखन केले पाहिजे.<br>□ सूत्रसंचालन : डॉ. श्रीनिवास इप्पलपल्ली<br>□ प्रास्ताविक : डॉ. विजय बालघरे<br>□ पाहुण्यांचा परिचय : प्रा. सुशील धसकटे<br>□ आभारप्रदर्शन : प्रा. अनिता गाडेकर | □ सदर कार्यक्रमामध्ये ६१ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. | □ विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष लेखकांशी संवाद.<br>□ लेखन-वाचन प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजली.<br>□ सर्जनशील लेखन कसे करावे, यावर चर्चा. |

| कार्यक्रम । उपक्रम | उद्दिष्टे | तपशील | सहभागी विद्यार्थी | फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| □ आंतरराष्ट्रीय पेन काँग्रेस साहित्यिक भेट | □ आंतरराष्ट्रीय पातळीवरील तीन आणि भारतीय पातळीवरील दोन लेखकांचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे.<br>□ त्यांच्याशी संवाद घडवून आणणे.<br>□ लेखकाच्या लेखनामागची भूमिका समजून घेणे. | □ शुक्रवार : दि. २८ सप्टेंबर २०१८<br>□ यूजीन शोल्गीन (नॉर्वे), ॲना नासिलोस्का (पोलंड), टेरेसा कॅंडेट (पोर्तुगाल), बाला पांडे (सिक्कीम), रंगन कृष्णसामी (तामीळनाडू) आदी मान्यवर लेखकांनी सहभाग घेतला.<br>□ प्राचार्या डॉ. भोसले म्हणाल्या : विद्यार्थ्यांनी पाचही मान्यवर लेखकांचे अनुभव ऐकून त्यापासून लेखनासाठी प्रेरणा घ्यावी.<br>□ यूजीन शोल्गीन म्हणाले : लेखकांनी चौफेर अनुभव घेणे महत्त्वाचे आहे. तेच लेखनास उपयुक्त ठरतात.<br>□ ॲना नासिलोस्का म्हणाल्या : विद्यार्थ्यांनी सोशल मीडियापासून दूर राहावे आणि वाचन करावे. मातृभाषेबरोबरच इंग्रजी ही काळाची गरज आहे.<br>□ टेरेसा कॅंडेट म्हणाल्या : विद्यार्थ्यांनी साहित्य आणि संस्कृतीचा सखोल अभ्यास करावा. वाचनामुळे जगभरातील संस्कृतींची ओळख होऊन आयुष्य समृद्ध होते.<br>□ बाला पांडे म्हणाले : विविधता हे आपल्या संस्कृतीचे बलस्थान आहे. आपण आपल्या मातृभाषा वाचवणे ही आपली जबाबदारी आहे.<br>□ सूत्रसंचालन आणि पाहुण्याचा परिचय : डॉ. श्रीनिवास इप्पलपल्ली<br>□ प्रास्ताविक : प्राचार्य डॉ. सुषमा भोसले<br>□ आभारप्रदर्शन : डॉ. विजय बालघरे | □ सदर कार्यक्रमामध्ये ९५ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.<br>□ याबरोबरच प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती. | □ विद्यार्थ्यांचा तीन परदेशी लेखकांशी परिचय झाला.<br>□ त्या त्या देशातील संस्कृती–पर्यावरण–समाजिकता, प्रश्न आदी विविध विषयांवरील सदरील लेखकांची मनोगते ऐकता आली.<br>□ सदरील लेखकांच्या पुस्तकाचा साहित्याचा विद्यार्थ्यांना परिचय झाला.<br>□ विद्यार्थ्यांनी साहित्य–समाज–संस्कृती आदी विविध मुद्द्यांच्या अनुषंगाने प्रश्न विचारून लेखकांशी प्रत्यक्ष संवाद साधला. |

| कार्यक्रम । उपक्रम | उद्दिष्टे | तपशील | सहभागी विद्यार्थी | फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| □ वाचन प्रेरणा दिन | □ विद्यार्थ्यांना ग्रंथांचा-लेखकांचा परिचय व्हावा, वाचनाबद्दल त्यांच्यात आवड निर्माण व्हावी, हा मुख्य हेतू.<br>□ माजी राष्ट्रपती व शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या विचारकार्याची ओळख करून देणे. | □ सोमवार : दि. १५ ऑक्टोबर २०१८<br>□ महाविद्यालयातील आठ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.<br>□ ग्रंथप्रदर्शन भरवण्यात आले.<br>□ मा. प्राचार्या डॉ. सुषमा भोसले यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. वाचनसंस्कृतीचे महत्त्व विशद केले. त्या म्हणाल्या : वाचन प्रेरणा दिनाच्या माध्यमातून आपण वाचनाकडे वळावे. पुस्तके वाचा व ग्रंथांना आपले मित्र बनवा. वाचनाने दिशा मिळते<br>□ सूत्रसंचालन : प्रा. सुशील धसकटे<br>□ प्रास्ताविक : डॉ. विजय बालघरे<br>□ आभारप्रदर्शन : प्रा. अपेक्षा जाधव | □ सदर कार्यक्रमामध्ये ४० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. | □ महाविद्यालयातील आठ विद्यार्थ्यांनी स्वतः वाचलेल्या व त्यांना आवडलेल्या पुस्तकावर आपले मत व्यक्त केले.<br>□ विविध विषयावरील पुस्तकांचा परिचय झाला. ग्रंथप्रदर्शनामुळे अनेक ग्रंथ विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष हाताळता आले. |

| कार्यक्रम । उपक्रम | उद्दिष्टे | तपशील | सहभागी विद्यार्थी | फलनिष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| ☐ शिक्षक-पालक सभा (कला शाखा) | ☐ शिक्षक-पालकांची ओळख.<br>☐ विद्यार्थ्यांच्या प्रगतीची माहिती पालकांना देणे.<br>☐ विद्यार्थी-पालक यांच्या समस्या समजावून घेणे.<br>☐ शिक्षक-पालक संवादसेतू निर्माण करणे. | ☐ शनिवार : दि. २० ऑक्टोबर २०१८<br>☐ प्रा. अपेक्षा जाधव यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रमांचा, अभ्यासक्रमांचा तपशीलवार आढावा आपल्या प्रास्ताविकपर भाषणात घेतला.<br>☐ या प्रसंगी श्रीमती शेख आणि बेदरकर या दोन पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. श्रीमती शेख म्हणाल्या : अशी सभा घेऊन महाविद्यालयाने एक स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. तर श्री. बेदरकर म्हणाले : अशा उपक्रमामुळे पालक म्हणून आम्हालाही आमचे मत मांडण्याची संधी मिळत आहे.<br>☐ प्राचार्या डॉ. सुषमा भोसले यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या : विद्यार्थी नियमित महाविद्यालयात येतात की नाही, दिलेला अभ्यास करतात की नाही, त्याची शैक्षणिक प्रगती कशी आहे, आदी बाबींची विचारणा पालकांनी करायला हवी. शिक्षक आणि पालक यांच्यामध्ये एक निखळ संवाद असणे ही काळाची गरज आहे. अशाप्रकारच्या शिक्षक-पालक सभा वर्षातून दोन्ही सत्रांमध्ये आयोजित करण्यात येतील.<br>☐ शिक्षक-पालक सभा कला-शाखेचे समन्वयक डॉ. विजय बालघरे यांनी सभेचे आभार मानले.<br>☐ सूत्रसंचालन : प्रा. सुशील धसकटे | ☐ सदर कार्यक्रमास शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. | ☐ शारदाबाई पवार यांच्या विचारकार्याचे यानिमित्ताने स्मरण.<br>☐ कर्तृत्ववान बहुजन स्त्रियांच्या कार्यांचा आढावा घेतला. |

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे

मामासाहेब मोहोळ महाविद्यालय

पौड रोड, पुणे ४११ ०३८

# । मराठी विभाग ।

□ मराठी विभागातील प्राध्यापकांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमात व शैक्षणिक कामकाजात सहभाग घेतला.
- मागील शैक्षणिक वर्ष २०१८-१८ चे निकाल
- एम. ए. मराठी उद्‌बोधन व मार्गदर्शन, तसेच अंतर्गत मूल्यमापन यशस्वीपणे पूर्ण केले.
- सर्व परीक्षांचे सुपरविजन केले.
- पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. अजितदादा पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या सायकल स्पर्धेच्या निवास व्यवस्थेची जबाबदारी.
- प्रा. सुशील धसकटे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित प्रतिष्ठेच्या डॉ. पी. सी. अलेक्झांडर आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले. (२९ सप्टेंबर २०१८)
- महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित गांधी सप्ताहात प्रा. सुशील धसकटे यांनी 'महात्मा गांधी आणि अहिंसा' या विषयावर व्याख्यान दिले.
- महाविद्यालयातील सर्व विभाग व समित्यांना सहकार्य.

□ मराठी विभागाकडे असणाऱ्या जबाबदाऱ्या व समित्या :

□ डॉ. विजय बालघरे
- वाङ्मय मंडळ
- प्रसिद्धी विभाग
- नियतकालिक विभाग
- आजीवन अध्ययन व विस्तार केंद्र
- पत्रकारिता कोर्स
- नॅक क्रायटेरिया नं. ४

□ प्रा. सुशील धसकटे (समन्वयक)
- ॲड ऑन कोर्स : बेसिक अकाऊंट रायटिंग (एफ. वाय. बी. ए.- ए डिव्हिजन)

□ प्रा. अनिता गाडेकर (सदस्य)
- नॅक क्रायटेरिया नं. ६

# । मराठी विभाग ।

## निबंध स्पर्धा

## १३ डिसेंबर २०१९

पद्मविभूषण मा. शरदचंद्र पवार साहेब यांच्या वाढ महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. पत्रकार श्री. उद्धव धुमाळे यांनी सावित्रीबाईंच्या जीवन व कार्यावर आपल्या व्याख्यानातून प्रकाशझोत टाकला.

याप्रसंगी श्री. धुमाळे म्हणाले, सावित्रीबाईंचे कार्य म्हणजे बहुजन स्त्रीमुक्तीचा समृद्ध देशी आविष्कार होता. आद्य गणमाता निऋति यांच्यापासून एक समृद्ध भारतीय बहुजन स्त्री परंपरा आपल्याकडे चालत आलेली आहे. सावित्रीबाई त्या परंपरेच्या पाईक होत्या. सावित्रीबाईंचे कार्य हे स्त्रियांच्या हक्कांसाठीचे एकंदर देश पातळीवरील सर्वांत मोठे व अतिशय महत्त्वाचे कार्य आहे. त्या भारतीय स्त्री शिक्षणाच्या आद्यप्रणेत्या व पहिल्या भारतीय महिला शिक्षिका होत. सावित्रीबाईंच्या प्रयत्नामुळे आजची भारतीय स्त्री शिकू शकली.

या कार्यक्रमाला मराठी विभागातील सर्व प्राध्यापक, तसेच बहुसंख्येने विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

स्थळ : मराठी विभाग । वेळ : सकाळी : १० वाजता